विषय :महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या प्रचार व प्रसिध्दीबाबत.

संदर्भ:- मा.राज्य सेवा हक्क आयुक्त, कोकण महसूली विभाग यांचेकडील पत्र क्र.
संकीर्ण-२०२३/प्र.क्र.९८/रासेहआ/कोवि /कक्ष-१/१६४ दि.३१/०८/२०२३

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्र सोबत जोडले असून त्यात नमूद केलेप्रमाणे , राज्यातील नागरीकांना राज्य शासनातर्फे दिल्या जाणा-या सेवा पारदर्शक, गतिमान व कालबध्द पध्दतीने देण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ पारित करण्यात आला असून सदर अधिनियम दि.२८.०४.२०१५ पासून अंमलात आला आहे. सदर अधिनियमाच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ व महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग यांच्याबाबत संक्षिप्त माहिती शासनाच्या सर्व विभागांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे उपयोगी ठरेल, असे आयोगाचे मत आहे.

त्याअनुषंगाने आयोगाकडून पत्रासोबत देणेत आलेली महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम व आयोग या बाबतची मराठी व इंग्रजी माहितीपत्रे सोबत आपणास पाठविण्यात येत आहेत. सदर माहितीपत्रे आपल्या कार्यालयाच्या संकेतस्थळावर सदर माहितीपत्रे प्रसिध्द करणेत यावीत व माहिती प्रसिध्द केल्याचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(गोपीनाथ ठोंबरे)
उप जिल्हाधिकारी (सा.प्र) ठाणे

**महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग, कोकण महसुली विभाग**

कक्ष क्र. 727/721, 7 वा मजला, कोकण भवन, नवी मुंबई - 400 614

दूरध्वनी क्र 20870515 Email - crts.konkan@maharashtra.gov.in

क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.९८/रासेहआ/कोवि/कक्ष-१/९८४ दिनांक : ३१ ऑगस्ट, २०२३

प्रति,

जिल्हाधिकारी,
ठाणे/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग.

विषय:- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या प्रचार व प्रसिद्धीबाबत.
संदर्भ:- मा. राज्य सेवा हक्क आयुक्त यांचे पत्र क्र. बैठक-२०२३/ प्र.क्र.१०९/ मुसेहआ/कक्ष-२, दि. ११.०८.२०२३.

राज्यातील नागरिकांना राज्य शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या सेवा पारदर्शक, गतिमान व कालबद्ध पद्धतीने देण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ पारित करण्यात आला असून सदर अधिनियम दि. २८.०४.२०१५ पासून अंमलात आला आहे. सदर अधिनियमाच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ व महाराष्ट्र लोकसेवा हक्क आयोग यांच्या बाबतची संक्षिप्त माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याबाबत संदर्भाधिन पत्रान्वये मा. राज्य सेवा मुख्य आयुक्त यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत.

३. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या प्रचार प्रसिद्धीसाठी अधिनियम व आयोग या बाबतची मराठी व इंग्रजी माहितीपत्रे सोबत आपणास पाठविण्यात येत आहेत. सदर माहितीपत्रे आपल्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावीत तसेच आपल्या जिल्ह्यातील इतर प्रमुख कार्यालयाच्या संकेतस्थळावर सदर माहितीपत्रे प्रसिद्ध करण्याबाबत कृपया संबंधितांना आपल्या स्तरावरून सूचना देण्यात याव्यात. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास पाठविण्यात यावा.

(बलदेव सिंह)
राज्य सेवा हक्क आयुक्त
कोकण महसूली विभाग

D:\28.02.2023\2023\अधिनियम प्रसिद्धीबाबत\प्रचार व प्रसिद्धीबाबत.docx

CS CamScanner

आपली सेवा आमचे कर्तव्य

## जिल्हयाच्या संकेतस्थळावरील मुखपृष्ठासाठी मजकुर

महाराष्ट्र राज्यातील नागरिकांना शासनामार्फत व शासनाचे अधिनस्त सर्व सार्वजनिक प्राधिकरणांमार्फत दिल्या जाणाऱ्या अधिसूचित सेवा पारदर्शक, गतिमान व विहित कालमर्यादेत देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ पारित करण्यात आला असून तो दि. २८.०४.२०१५ पासून अंमलात आहे. नागरिकांना सुलभ व कालमर्यादित सेवा मिळाव्यात हे त्याचे उदिष्ट आहे.

वरीलप्रमाणे अधिसूचित सेवा नागरिकांना दिल्या जात आहेत किंवा नाही यावर देखरेख, समन्वय, सनियंत्रण ठेवण्यासाठी व या संदर्भात सुधारणा सुचविण्यासाठी उपरोक्त कायद्यान्वये महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग गठीत करण्यात आला असून आयोगामध्ये एक मुख्य आयुक्त व सहा आयुक्त कार्यरत आहेत. आयोगाचे मुख्यालय नविन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई येथे असून सहा विभागातील मुख्यालयाच्या ठिकाणी आयुक्तांची कार्यालये आहेत.

पात्र नागरीकांना विहित वेळेत सेवा न मिळाल्यास अथवा नियमोचित कारणाशिवाय ती नाकारल्यास अशा निर्णयाविरुद्ध संबंधितांना वरीष्ठांकडे प्रथम व द्वितीय अपिल करता येते व तरीही समाधान न झाल्यास आयोगाकडे तृतीय अपिल करता येते. कसूरदार अधिकाऱ्यास प्रतिप्रकरण रु. ५०००/- पर्यंत दंड होऊ शकतो.

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाची वेबसाईट खालीलप्रमाणे आहे :- https://aaplesarkar.mahaonline.gov.in



CamScanner

## Matter for Homepage of District Website

The Maharashtra Right to Public Services Act, 2015 is enacted and is in force since 28.04.2015 to ensure that notified services are provided to the citizens in a transparent, speedy and time-bound manner by various Government Departments and Public Authorities under the Government. Its objective is to provide easy, prompt and time bound services to the citizens.

The Maharashtra State Commission for Right to Public Service has been constituted under the above Act to monitor, coordinate, control and improve the public services being provided by the Government. The Commission consists of a Chief Commissioner and six Commissioners. The headquarter of the Commission is at the New Administrative Building, Opposite Mantralaya, Mumbai and the Divisional Offices of the Commissioners are at the six Divisional Headquarters.

If any notified service is not provided to any eligible person within stipulated time or is rejected without proper grounds, the concerned person may file 1st and 2nd appeals with the higher authorities and if he is not satisfied with their decision, he may prefer third appeal to the Commission. The erring officer is liable for a penalty up to Rs 5000/- per case.

Website of the Maharashtra State Commission for Right to Service is :-
https://aaplesarkar.mahaonline.gov.in



CS CamScanner